**शालेय विद्यार्थ्यांना आधारकार्ड देण्यासाठी अभियान**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१५ /प्र.क्र.४९/एस.डी-१**
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २१ एप्रिल, २०१५

**प्रस्तावना**-

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेच्या पटावर नोंदविले जाणे, नियमित शाळेत येणे आणि त्याला दर्जेदार शिक्षण मिळणे याचा हक्क प्राप्त झाला आहे.

समाजातील ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालक शाळेत आल्याशिवाय आणि नियमितपणे शाळेत उपस्थित राहून दर्जेदार शिक्षण घेतल्याशिवाय शिक्षण हक्क कायद्याला पूर्णत्व प्राप्त होणार नाही. समाजातील तळागाळातील प्रत्येक बालक शाळेत यावे, शिकावे या महत्वाच्या उद्देशासाठी जे विद्यार्थी अजूनही शाळाबाह्य आहेत त्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सर्व प्रकारच्या शाळाबाह्य मुलांना सर्व प्रकारचे प्रयत्न करुन शाळेत प्रवेशीत करण्याचा शासनाचा संकल्प आहे. हा संकल्प सार्थ करण्यासाठी शासनस्तरावर विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. प्रवेशोत्सवात प्रत्येक बालकांच्या घरी जाऊन प्रवेश फॉर्म भरुन त्याची पटावर नोंद केली जाते. प्रत्येक प्रवेश पात्र बालकाला प्रवेश दिला जातो. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ या अधिनियमाच्या यशस्वी अंमलबजावणीतील सर्वात मोठी समस्या म्हणजे शाळाबाह्य असलेल्या बालकांना शाळेत आणणे ही आहे. तसेच, पटावर नोंदविलेले प्रत्येक बालक आठव्या इयत्तेपर्यंत शाळा सोडून जाणार नाही याची दक्षता घेणे हा शिक्षण हक्क कायद्याच्या यशस्वी अंमलबजावणीतील महत्वाचा टप्पा आहे.

आजपर्यंत शिक्षण विभागाने शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध प्रयोग, संकल्प आणि उपक्रम हाती घेतले. परंतु ते प्रयत्न तात्कालिन ठरले. या समस्येवर विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढून कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय**-

राज्यातील शाळांमध्ये प्रवेशित प्रत्येक बालकांचे आधारकार्ड काढून ते प्रवेश क्रमांकाशी जोडण्यात यावे. शाळांनी प्रवेश दिलेल्या प्रत्येक बालकाचे आधारकार्ड तयार करण्यासाठी दिनांक २७ एप्रिल ते २६

जून हा कालावधी निश्चित केला आहे. शालेय विद्यार्थी आधारकार्ड अभियान कार्यान्वित करण्याचा शासनाने निर्धार केला आहे. प्रवेशीत प्रत्येक बालकांच्या प्रवेश नोंदणी पंजिकेतील क्रमांक आता आधार कार्डाशी जोडण्यात यावा. त्यामुळे भविष्यात एकही बालक शाळाबाह्य होणार नाही व झालेच तर ते कुठे व कोणत्या ठिकाणी आहे. याबाबतचा शोध घेणे सुलभ येईल व त्याच्या प्रगतीबाबत पालकांना माहिती घेणे शक्य होईल.

२. **प्रवेशीत बालकांचे आधार कार्ड तयार करुन प्रवेश क्रमांकाशी जोडण्याची कार्यप्रणाली :-**

जिल्हास्तरावरुन जिल्हाधिकारी यांनी आधारकार्ड निर्मितीसाठी जी यंत्रे उपलब्ध आहेत त्याचा पर्याप्त उपयोग करुन या ६० दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यातील आधारकार्ड तयार करण्यात न आलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे तालुका, गावनिहाय नियोजन करण्यात यावे. उपलब्ध संसाधनाचा पर्याप्त वापर करुन २६ जून पर्यंत १०० टक्के बालकांचे आधार कार्ड तयार करुन ते प्रवेशाशी संलग्न करावेत. कोणत्या गावात किती बालकांचे आधार कार्ड तयार केलेली नाहीत, याबाबतची माहिती शाळांकडून गट शिक्षणाधिकारी यांनी संकलीत करुन शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सुपूर्द करावी.

३. ८ मे ते २५ जून या कालावधीत गाव, वॉर्ड व शाळास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले निवेदन सर्व संबंधितांना कळवावे व त्यानुसार आधारकार्ड तयार करण्याचे कार्यवाही करावी. जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन याबाबत **प्रपत्र "अ"** मधील वेळापत्रका प्रमाणे कार्यवाही करावी.

४. **आधारकार्ड कार्यवाही आणि अहवाल:**

गाव अथवा शाळास्तरावर आधारकार्ड काढण्याच्या नियोजनानुसार काटेकोर अंमलबजावणी करावी. जिल्हाधिकारी अथवा तहसीलदार यांची यंत्रणा आधारकार्ड काढण्यासाठी गावात/ वॉर्डात/ शाळेत येतील त्या दिनांकाच्या पूर्वदिनी शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख आणि शिक्षक, मुख्याध्यापकांनी सकाळीच शाळेत येऊन ज्या ज्या बालकांची आधारकार्ड तयार करावयाची आहेत त्या त्या बालकांच्या घरी जाऊन त्या बालक आणि पालकांस याची पूर्व कल्पना द्यावी व उद्या किती वाजता शाळेत अथवा ग्रामपंचायत मध्ये उपस्थित राहायचे याबाबत माहिती द्यावी, दवंडी द्यावी, शाळा परिसर, फलक स्वच्छ करावेत. जमल्यास शाळेसमोर रांगोळी रेखाटावी आणि दर्शनी फलकांवर आधारकार्ड नियोजन लिहून ठेवावे. पहिल्याच दिवशी सर्व यंत्रणा सुसज्ज ठेऊनही काही विद्यार्थी शिल्लक राहिलेच तर आणखी एक दिवसाचे नियोजन गटशिक्षणाधिकारी यांनी करावे. ज्या दिवशी आधारकार्ड काढण्यासाठी महसूल विभागाची यंत्रणा नियेजित दिनांकाला गावी/ शाळेत येईल त्याच दिवशी केंद्र प्रमुखास खालील तक्त्यात एक संक्षिप्त स्वरुपात माहिती द्यावी.

| अ.क्र. | शाळेचे नाव | एकूण विद्यार्थी | पूर्वी आधार कार्ड तयार विद्यार्थी संख्या | आज आधार कार्ड तयार विद्यार्थी संख्या | उर्वरीत विद्यार्थी संख्या | आधार न काढण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

५. <u>आधारकार्ड अभियानाचे प्रबोधन:</u>

१) राज्यातील प्रत्येक गाव, शाळा, नागरिक, युवक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था यांनी या १०० टक्के बालकांना आधारकार्ड तयार करुन देण्याच्या अभियानाचा एक भाग व्हावा. अशी शासनाची अपेक्षा आहे.

२) शिक्षकांच्या पतसंस्था, संघटना, दानशूर नागरिक यांच्या सहकार्याने सदर अभियानाचा पुरेशा प्रमाणात प्रसार व उदबोधन करावे.

३) त्यांनी बाजार, रेल्वे स्थानक, बसस्थानकावर अभियानाची प्रचारपत्रके, बॅनर्स लावावीत.

४) स्थानिक दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे या माध्यमातून या अभियानाचा भरपूर लोकजागर, प्रचार व प्रसार करावा.

५) सोशल मिडियाच्या माध्यमातून व्हॉट्स ॲप, ई-मेल, फेसबुक याद्वारा विविध शिक्षक, संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी या अभियानाचा प्रचार करावा.

६) या अभियानात ग्रामस्तरावर सरपंच व ग्राम पंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, युवक संघटना, स्वयंसेवी संस्था यांचा शाळांनी सहभाग घ्यावा. तालुका स्तरावर पंचायत समिती सभापती, सर्व सदस्य यांनी पदयात्रा काढून त्यांच्या मतदार संघात या अभियानामध्ये सहभाग घ्यावा.

६. जिल्हा स्तरावर मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद सर्व सन्माननीय सदस्यांना आपापल्या मतदार संघात पदयात्रेने लोकभेटी घेऊन या अभियानात सहभागी होऊन अभियान यशस्वी राबविण्याकरीता सहकार्य करावे.

७. सदर एक दिवशीय शालेय विद्यार्थी आधारकार्ड मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी योग्य ते सहकार्य करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०४२११३५८०८१४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mali Baban R

Digitally signed by Mali Baban R
DN: CN = Mali Baban R, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = School Education & Sports Dept
Date: 2015.04.21 14:21:05 +05'30'

**(बी.आर.माळी)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. मा. प्रधान सचिव / सचिव सर्व विभाग यांचे स्वीय सहाय्यक
६. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
८. विभागीय आयुक्त, सर्व
९. जिल्हाधिकारी, सर्व
१०. शिक्षण संचालक, सर्व
११. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
१२. शिक्षणाधिकारी , सर्व
१३. निवड नस्ती (एस.डी.१)

## प्रपत्र "अ"

| अ.क्र. | दिनांक | कामाचे स्वरुप | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २७ एप्रिल ते २ मे, २०१५ | गटशिक्षणाधिकारी यांनी आपल्या गटतील ज्या शाळातील विदयार्थ्याचे आधार कार्ड अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत अशा विदयार्थ्यांची शाळानिहाय माहिती शिक्षणाधिकारी यांना उपलब्ध करुन देणे. | गटशिक्षणाधिकारी |
| २ | ३ मे, २०१५<br>ते<br>४ मे, २०१५ | गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून आलेली माहिती एकत्रित करुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी आधारकार्ड न काढल्या गेलेल्या बालकांची गावनिहाय यादी जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करणे. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) |
| ३ | ५ मे, २०१५ | जिल्हाधिकारी कक्षातील संबंधित अधिकाऱ्यांशी गटशिक्षणाधिकारी यांचेसह गावनिहाय नियोजनासाठी संसाधनानुसार तालुक्यातील कोणत्या शाळेतील किती विद्यार्थ्यांचे आधारकार्ड कोणत्या दिनांकाला तयार करावयाचे याची याबाबत बैठक घेऊन नियोजन करणे. | जिल्हाधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (सर्व)<br>गटशिक्षणाधिकारी |
| ४ | ६ मे, २०१५ | गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख आणि मुख्याध्यापक यांच्याशी केलेल्या नियाजनाबरहुकम कार्याची दिशा निश्चित करणे. | गटशिक्षणाधिकारी |
| ५ | ७ मे, २०१५ | मुख्याध्यापकांनी शाळा स्तरावर शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व पालकांशी आधार कार्डाचे महत्व विशद करुन आपल्या गावात किती विद्यार्थ्यांना अजून आधारकार्ड देणे बाकी आहे याबाबत चर्चा करावी आणि कोणत्या दिवशी किती वाजता उर्वरित बालकांचे आधार कार्ड काढण्यात येईल याबाबतचे नियोजन पालक आणि बालकांना द्यावे. त्याचप्रमाणे आधारकार्ड तयार करण्याच्या नियोजनाची माहिती दिनांक, वार आणि वेळेसह दवंडी देऊन, लाऊडस्पिकरवर आणि शाळा, ग्रामपंचायत कार्यालयात नोटीस लावून जाहीर करावी. | केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक |
| ७ | ८ मे, २०१५ | गावातून प्रात: फेरी काढून आधारकार्ड नियोजनाचा प्रचार प्रसार करावा. बैठक घेऊन गावकऱ्यांना पुन्हा नियोजन सांगून १०० टक्के बालकांचे आधारकार्ड तयार करण्याचा संकल्प करुन प्रतिज्ञा द्यावी. | मुख्याध्यापक<br>शिक्षक |

# प्रतिज्ञा

**आम्ही प्रतिज्ञा करतो की,**

आम्ही सर्व विद्यार्थी, पालक, गावकरी आणि शिक्षक अशी प्रतिज्ञा करतो की आमच्या शाळेतील प्रवेश घेतलेल्या प्रत्येक बालकाचे आधारकार्ड काढून घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

विद्यार्थी लाभाच्या सर्व योजना या आधारकार्डाशी जोडण्यात येतील आणि त्याचा लाभ प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना घेता येईल याची आम्हाला जाणीव आहे. तसेच आधारकार्डाच्या क्रमांकाशी आमची शाळेतील प्रगती जोडण्यात आल्यामुळे आम्हाला कोणता विद्यार्थी काय आणि किती शिकत आहे, याचीही जाणीव होईल. या आधारकार्डाच्या क्रमांकाशी विद्यार्थी संलग्न झाल्यामुळे शिक्षण पूर्ण होईपर्यंत विद्यार्थी शाळेशी जोडलेले राहून कोणीही शाळाबाहय होणार नाही. अशीही आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

**जयहिंद - जय महाराष्ट्र**